## पुष्प पांचवें

अध्यक्ष — भाऊसाहेब हिरे

वक्ते — हरिभाऊ पाटसकर

१२ मे १९४९

### भाषावार प्रांत कां पाहिजेत ?

भाषावार प्रांतांच्या मागणीचा विकास देशाच्या घटनात्मक प्रगतीबरोबर होत आला आहे. राज्यकारभारांत ज्यावेळीं हिंदी जनतेचा हात नव्हत त्यावेळीं केवळ कारभाराच्या सोईसाठीं ब्रिटिशांनीं प्रांत बनविले. पण १९१९ सालीं जेव्हां हिंदी जनतेचा हात राज्यकारभारांत शिरकूं देण्याचा निर्णय ब्रिटिशांनीं घेतला त्यावेळीं प्रांतांची पुनर्रचना करण्याची गरज त्यांनी प्रथम मान्य केली. प्रांतिक स्वायत्तता देण्याचें वेळीं म्हणजे १९३५ सालीं मुंबईपासून सिंध व बिहार पासून ओरिसा वेगळा काढण्याची त्यांनीं तरतूद करून ठेविली १९४६ सालीं घटनासमिती स्थापन झाली. २२ जानेवारी १९४७ रोजीं संघराज्याच्या उद्दिष्टांचा ठराव करण्यांत आला. त्यामध्यें प्रांतांची पुनर्रचना गृहीत धरण्यांत आली आहे. कारण संघराज्याच्या नागरिकांचा राज्यकारभाराशीं जास्तींत जास्त संबंध आणण्याचा व खरी लोकशाही स्थापत करण्याचा ह्या घटनेचा उद्देश स्पष्ट करण्यांत आला होता; आणि हा उद्देश सफल करण्यासाठीं भाषावार प्रांत बनविणें अपरिहार्य ठरतें.

आतांपर्यंतच्या घोषणांना धरून वर्तन करावयाचें तर भाषावार प्रांत बनविणें क्रमप्राप्त ठरतें. भाषावार प्रांतांची मागणी सहज, स्वाभाविक व न्याय्य आहे. सहाजिकच संयुक्तमहाराष्ट्राचा प्रश्न साधा, सोपा व सरळ आहे आणि तसा तो मानला पाहिजे.

## दार समितीची कारवाई

परंतु दार कमिशनची नेमणूक झाल्यानंतर या प्रश्नाचें सारें स्वरूपच पालटलें. मुंबई व मद्रास हे स्वतंत्र प्रांत करावे काय ! हा प्रश्न आमच्या नकळत कमिशनच्या प्रश्नावलींत कसा गेला कोण जाणे ! घटना समितीनें संमत केलेल्या तत्वांत या प्रश्नास जागाच नाहीं. दार कमिशननें आपल्या कामाच्या मर्यादा सोडल्या व अनेक काल्पनिक अडचणी निर्माण करून संयुक्तमहाराष्ट्राची मागणी मुळांतच गाडून टाकण्याची कारवाई केली.

## मुंबई महाराष्ट्रांतच हवी

उपप्रांताचा प्रश्न दार कमिशननें नव्यानेंच उपस्थित केला. असा उपप्रांत केल्यास मुंबईची वस्ती ६० लाखाहून कमी असल्यानें घटनात्मकदृष्टया तो मध्यवर्ती सरकारच्या कक्षेतील विभागांत जाईल. म्हणजे तेथील लोकांना लोकशाही मिळणार नाहीं. विरोधकांनीं ह्या बाबतींत फारसा विचार केलेला दिसत नाहीं. स्वातंत्र्यसंग्रामांत ज्या लोकांनीं फार मोठा भाग घेतला त्या मुंबईचा ताबा केंद्रीय सरकारनें नेमलेल्या एखाद्या उपन्या गव्हर्नराकडे गेला तर मूठभर धनिक लोक सोडून मुंबईची बाकीची जनता मुंबईत प्रलय करून सोडल्याशिवाय राहाणार नाहीं. मुंबई महाराष्ट्रांत आली नाहीं तर जनता तेथिल व्यापार—धंदा नष्ट केल्यावांचून राहाणार नाहीं असा धोका दिसतो. ती महाराष्ट्रांतच राहिली पाहिजे. त्याबाबत सार्वमताचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. उद्यां पुण्यांत आलेल्या सिंधी लोकांची वस्ती जर वाढली तर काय पुण्यांत सार्वमत घ्यावयाचें ? ह्या मागणी मागें संकुचित प्रांतीयता, भाषिक साम्राज्यलालसा असल्याचा आरोप करण्यांत येतो तोही वृथा आहे.

## महाराष्ट्रीयांची जबाबदारी

मुंबईसह महाराष्ट्र निर्माण करण्याची जबाबदारी महाराष्ट्रीयांचीच आहे आतां आंध्र झाला, उद्यां कर्नाटक-केरळ बनेल म्हणजे परवा महाराष्ट्र होईलच असें मानण्याचें कारण नाहीं. ज्याचे प्रश्न त्यानें सोडविण्याची प्रवृत्ती

वाटत आहे. आंध्र म्हणतात आम्ही मद्रास सोडतो तुम्ही मुंबई सोडा. त्यांचा कदाचित् मद्रासवर हक्कच नसेल ! संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न निघतो तेव्हां कर्नाटक तटस्थ राहातो. या पासून धडा घेतला पाहिजे. मुंबई हें बेट आहे, संरक्षणासाठीं ती स्वतंत्र राहिली पाहिजे असले वायफट अक्षेप दूर करून आपण संयुक्त महाराष्ट्राकरतां झटलें पाहिजे.

हें करतांना आपण पक्षातींत भूमिका ठेवली पाहिजे. त्रिमूर्ती अहवालानंतर काँग्रेस कार्यकर्ते काय करणार अशी शंका अनेकांना येते. त्या अहवालांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं " आमचा लोकशाहीवर विश्वास आहे. मुंबई स्वतंत्र ठेवावी असें आम्हास वाटते. पण यावरुद्ध प्रभावी लोकमत दिसून आलें तर तें मान्य व्हावें ". तेव्हां संयुक्त महाराष्ट्राचा काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रचार केला तर त्यावर शिस्तभंगाचा उपाय परप्रांतीयांनीं सुचवूं नये. मुंबई-सहच महाराष्ट्र हवा. तसें झालें नाहीं तर संघराज्याच्या स्थैर्याला धोका आहे हें सरकारला सांगणें आमचें पवित्र कर्तव्य आहे. काँग्रेस कार्यकर्ते हें कर्तव्य जरूर पार पाडतील. त्यांत त्यांचा कसलाही गुन्हा होणार नाहीं.

## महाराष्ट्र व राजकारण

जयकर एकदां म्हणाले होते कीं राजकरणांत महाराष्ट्र जेथें हवा तेथें तो आज नाहीं. ही परिस्थिती पालटली पाहिजे. यासाठीं साऱ्यानींच एकजूट, एकविचार, केला पाहिजे. हें झालें तर संयुक्त महाराष्ट्र आपलाच आहे यांत मला बिल-कुल शंका नाहीं. परंतु एकच गोष्ट नडते. महाराष्ट्रांत त्याबाबत अजूनही पुरेशी जागरूकरता नाहीं. उदासीनता व मतभेद आढळतात. माझें एकच मागणें आहे. जे आतांपर्यंत उदासीन होते त्यांनीं कृपाकरून विरोधी आवाज निर्माण करण्याच्या भानगडीत न पडतां उदासीनच रहावें. त्यांच्यावाचून आम्हीं संयुक्त महाराष्ट्र मिळवूं. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं तरी कुठें ४० कोट लोक लढले होते ! आणखी एकच गोष्ट. आपण संयुक्तमहाराष्ट्राच्या प्रश्नांत आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा इतर प्रश्नांची गल्लत करूं नये. ती केली तर ही आघाडी विस्कळीत झाल्यावाचून राहाणार नाहीं.

## अध्यक्षीय समारोप

पुढचं पाऊल उचलायचं झालंच तर तयारी आहे हें स्पष्टपणें सूचित करण्याचं काम महाराष्ट्र प्रांतिकच्या ठरावानं केलें आहे. हा ठराव इतर प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांच्या ठरावां पेक्षां अधिक कडक आहे. कांहीं अपवाद सोडले तर या ठरावाचें सर्वांनीच स्वागत केलें आहे. महाराष्ट्र प्रांतिक संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न कधींही डावलणार नाहीं. काय करील तें सांगणें आज शहाणपणाचें नाहीं. पण हा प्रश्न आम्ही नेटाने धसास लावू असा विश्वास धरा.

आज महाराष्ट्राचा प्रश्न सोडवायचा तर नेत्यांची गरज आहे. शिवाजी हवा. लोकमान्य हवे. चंद्रराव मोरे कोण ? सूर्याजी पिसाळ कोण ? याचा शोध घेण्याची गरज नाहीं. आधीं शिवाजी शोधा.

हें करतांना आपण जिभेला थोडा आळा घातला पाहिजे. मुंबईचें बर्लिन करू अशी भाषा बंद झाली पहिजे. नागपूरकर पुण्याला भितात. ही भिती, असे आक्षेप दूर करावयाचे तर संयमाने वागलें पाहिजे. हा प्रश्न लोकशाहि मार्गानेच सोडविला पाहिजे. त्याला कदाचित् दहा वर्षें लागतील. पण म्हणून संयम सोडूं नये.